स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६**
Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in ddtpho_pune@rediffmail.com

---

## कार्यालयीन आदेश

**विषय :** नगर रचनाकार, गट-अ (राजपत्रित) मधील अधिकाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लाभ अनुज्ञेय करण्याबाबत.

**संदर्भ:** १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.एसआरव्ही-१०९५ /प्र.क्र.१/ ९५/ बारा, दि.०८/०६/१९९५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०/०७/२००१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दि.११/०१/२००२.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/ सेवा ३, दि.०१/०४/२०१०.
५) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दि.०५/०७/२०१०.
६) शासन, नगर विकास विभाग, आदेश क्र.विचौप्र-२८१५/११०४/ प्र.क्र.१८३/नवि-२७, दि.०१/०७/२०१९.
७) शासन, नगर विकास विभाग आदेश, क्र.विचौप्र-२८१५/११०४/ प्र.क्र.१८३/नवि-२७, दि.०३/०२/२०२२.
८) शासन, नगर विकास विभाग पत्र क्र.विचौप्र-२८१५/११०४/ प्र.क्र.१८३/नवि-२७, दि.०४/०२/२०२२.

संदर्भ (१) दिनांक ८ जून १९९५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंमलात आलेली गट-क व गट-ड (वर्ग-३ व वर्ग-४) मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने आलेली कुंठीतता घालविण्यासंबंधीची कालबद्ध पदोन्नती योजना संदर्भ (२) दिनांक २०, जुलै २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली असून त्याऐवजी सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली आहे. ही योजना पाचव्या वेतन आयोगानुसार रु.८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू करण्यात आली आहे. संदर्भ (३) दिनांक ११ जानेवारी, २००२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, या योजनेचा लाभ अनुज्ञेय असलेल्या गट-अ मधील राजपत्रित तसेच गट-ब

मधील राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी/कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करण्याचे अधिकार राज्यस्तरीय विभाग प्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत.

०२. संदर्भ क्र.(२) दि.२० जुलै, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(४) शासन निर्णय दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, सुधारित स्वरुपात यापुढे **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना या नावाने दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून अंमलात आली आहे**. ही योजना कमाल वेतन बँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + ५४००/- ग्रेड पे घेणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना इतर शर्ती व अटींचे अधिन राहून सदर लाभ अनुज्ञेय केलेला आहे.

०३. संदर्भ क्र.(४) दि.१ एप्रिल, २०१० अन्वये, कार्यान्वित असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.(५) शासन निर्णय दि.५ जुलै, २०१० अन्वये, शासनामधील पदोन्नतीची संधी नसलेल्या तसेच एकाकी पदांना दि.१ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आली आहे. तसेच सदरहु सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कमाल वेतनबँड पीबी-३ (रु.१५६००-३९१००) + रु.५४००/- पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या एकाकी पदांवरील कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आली असून या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीत कमाल दोन वेळा वेतन संरचना मंजूर करण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

०४. शासन, वित्त विभागाच्या संदर्भ क्र.(६) च्या दि.०१ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये विहित संधीत/ मुदतीत अर्हता परिक्षा किंवा विभागीय परिक्षा उत्तीण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावलेल्या व परिणामी कालबध्द पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या काही कर्मचाऱ्यांनी कालबध्द पदोन्नतीचे लाभ मिळणेबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.२२/२००५, क्र.७३१/२००६, क्र.३५७/२००६,क्र.३२८/२०१० व संलग्न मूळ अर्ज यामधील अर्जदार तसेच मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमधील पारित न्याय निर्णयाच्या अनुषंगाने, शासनाचा वित्त विभागाकडील दि.१५/१०/२००९ रोजीच्या शासन निर्णय दि.२१/०५/२०१० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये रद्द करुन (Canceling)पुढीलप्रमाणे सुधारित शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

(अ) अर्हता परीक्षा किंवा विभागीय परीक्षा विहित संधीत/ मुदतीत उत्तीर्ण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावली असेल अशा कर्मचाऱ्यांने १२ वर्षांच्या नियमित सेवा कालावधीत सदर परीक्षा उत्तीर्ण केल्यास त्याला नियमित सेवेची १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतरच्या लगतच्या तारखेस.

अथवा

(ब) १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर, विभागीय/ ***अर्हता परीक्षा*** उत्तीर्ण झाल्याच्या तारखेस

०५. उपरोक्त (अ) अथवा (ब) यापैकी कोणत्याही प्रकारात मोडणाऱ्या कर्मचारी/ अधिकारी यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीतील पात्रतेनुसार, (त्याच्या सुधारीत ज्येष्ठता सूचीतील स्थानात बदल न करता) कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याबाबत तरतुद करण्यात आली आहे.

०६. श्रीमती. अर्चना मधुकर पार्लेवार, नगर रचनाकार यांचेविरुध्द अनियमितता (Mass irregularities) केल्याप्रकरणी दोन विभागीय चौकशी सुरु करुन शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि.०१/०७/२०१९ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे शिक्षा देण्यात आली होती.

अ. श्रीमती. अर्चना मधुकर पार्लेवार, नगर रचनाकार (गट-अ / राजपत्रित) यांचे सद्याचे वेतन पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी वेतन समयश्रेणीत (वेतनबँड रु.१५६००-३९१०० + ग्रेड पे रु.५४००) दि.०१/०१/२००६ रोजी घेतलेल्या टप्प्यावर खाली आणण्यात यावे.

ब. उक्त ०३ वर्षाच्या कालावधीत त्यांना वेतनवाढी अनुज्ञेय होणार नाहीत आणि असा शिक्षेचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या परिणामी त्यांच्या भावी वेतनवाढी पुढे ढकलल्या जातील.

सदर शिक्षेविरुध्द श्रीमती पार्लेवार यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मूळ अर्ज क्र.६९८/२०१९ दाखल केला होता. सदरहू प्रकरणी मा.न्यायाधिकरणाने दि.०१/०२/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभाग, यांचे अभिप्राय विचारात घेता, शासनाने संदर्भ क्र.७ अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

**"श्रीमती. अर्चना मधुकर पार्लेवार, नगर रचनाकार यांची पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता दोन वर्षासाठी रोखण्यात यावी."**

तसेच उक्त शिक्षा दि.०१/०७/२०१९ च्या आदेशाच्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहील.

शासनाने संदर्भ क्र.८ अन्वये श्रीमती.पार्लेवार, नगर रचनाकार यांना कालबध्द पदोन्नती मंजूर करणेबाबतची आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. उपरोक्त सर्व शासन निर्णय विचारात घेऊन तसेच दिनांक ०१/०२/२०२० रोजीच्या शासन, वित्त विभागाच्या शुध्दीपत्रकातील अटींच्या अधीन राहून नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील नगर रचनाकार, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

## सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ.

१) नगर रचनाकार पदावर कार्यरत खालील अधिकाऱ्यास पहिला लाभ म्हणून सहायक संचालक, नगर रचना (गट-अ) या वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगानुसार रुपये १५६००-३९१०० (ग्रेड वेतन ६६००/-) मध्ये तर सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२३, रु.६७७००-२०८७००/- मध्ये मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | नाव व शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग/ जातीदावा वैध/अवैध | सध्याच्या पदावरील नियुक्तीचा दिनांक | सु.से.आ.प्र. योजनेचा पहिला लाभ मंजूर करण्यात येत असलेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती. अर्चना मधुकर पार्लेवार, बी.आर्च., एम.टेक | अ.जा. (वैध) | ०९/०७/१९९९ | ०१/०७/२०२१ | विभागीय चौकशीच्या अनुषंगाने शासन, नगर विकास विभागाकडील दि.०३/०२/२०२२ रोजीच्या आदेशानुसार श्रीमती.पार्लेवार यांची पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता दोन वर्षासाठी रोखण्यात यावी ही शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच उक्त शिक्षा दि.०१/०७/२०१९ च्या आदेशाच्या दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहणार आहे. सदरहू शिक्षेचा कालावधी दि.३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात आला असल्याने पहिला लाभ मंजूर करण्यात आला आहे. |

०९. वरील अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र.११ (१) खालील पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीसाठी द्यावयाचा विकल्प अनुज्ञेय आहे. त्यांनी तसा विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. त्यानंतर आलेल्या विकल्पाचा विचार केला जाणार नाही, आणि त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११(१) (ए) नुसार केली जाईल.

२. संदर्भ क्र.(७) ते (९) नुसार संबंधितास सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्यात येत आहे. सदर आदेशात नमूद करण्यात आल्यानुसार त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या रक्कमेचा फरक अदा करण्यात यावा.

३. शासन निर्णय दि.१ जुलै, २०११ सोबतचे परिशिष्ट-अ मधील मुद्दा क्र.१३ मधील स्पष्टीकरण विचारात घेता सदर अधिकाऱ्याचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त असल्याने त्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा आर्थिक लाभ मंजूर करण्यात येत आहे.

४. वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतन निश्चितीत मिळालेला लाभ हा त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (functional) पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा देय होणार नाही. या योजनेअंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी मिळाली तरी उपरोक्त अधिकारी यांचे नाव (मूळ) कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतच राहील.

५. उपरोक्त अधिकारी यांना भविष्यात पदोन्नती दिल्यानंतर जर त्यांनी पदोन्नती नाकारली किंवा ते नियमित पदोन्नतीस अपात्र ठरले तर, पदोन्नती नाकारल्याच्या दिनांकापासून किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्याच्या दिनांकापासून त्यांना या योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र त्यापूर्वी देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

६. या आदेशान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभाची नोंद संबंधित अधिकाऱ्याच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे)**

जा.क्र.आस्था/सुसेआप्रयो/नर/गट-अ/प्रशा-१/४४०८
मध्यवर्ती कार्यालये, पुणे — ४११ ००१
दिनांक - ३० /०८/२०२२

( वि.ल.वाघमोडे )
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

**प्रत माहितीस्तव सादर-**

१) मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७/नवि-३, मंत्रालय, मुंबई.
२) मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
३) मा.महालेखापाल, नागपूर-२.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग.
२) उपसंचालक, नगर रचना, ना.सं.घ.,पुणे.
३) सहायक संचालक, नगर रचना, गडचिरोली.
४) कोषागार अधिकारी, गडचिरोली.
५) कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, प्रशा-१/१अ/१ ब/प्रशा-२/लेखा/अर्थसंकल्प.
६) श्री.पालकर, स्वी.स./श्रीमती हुपरे, उ.श्रे.ल.ले.
७) संशोधन अधिकारी, ना.सं.घ./ रा.ना.मा.प.कक्ष
//- प्रस्तुत आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.
८) वैयक्तिक धारिका
९) श्रीमती.अर्चना मधुकर पार्लेवार, नगर रचनाकार.